# जायखेडा : प्रेम संबंधात अडथळे, तरुणाची आत्महत्या

## संतप्त जमावाचा पोलीस ठाण्यात ठिय्या । होमगार्डच्या हस्तक्षेपाने खळबळ





**सटाणा ।** बागलाण तालुक्यातील जायखेडा येथे २५ वर्षीय विकी रवींद्र आहिरे या तरुणाने प्रेमसंबंधात अडथळे आल्यामुळे गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. मात्र मुख्य आरोपी असलेला होमगार्ड पोलिसांच्या अभयामुळे बचावत असल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी केला आहे. शुक्रवारी (दि. २७) दुपारी विकीने गावातील श्रीपुरवडे रस्त्यावरील मळ्यातील घरात गळफास घेत आपले जीवन संपवले. त्याचे कुटुंबीय व गावकऱ्यांनी याची माहिती पोलिसांना दिली. मात्र पोलिसांचे घटनास्थळी आगमन तब्बल दोन तासांनी झाल्याने नागरिकांमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. आरोपींना तात्काळ अटक करावी अशी मागणी करत जमावाने जायखेडा पोलीस ठाण्याबाहेर रात्री उशिरापर्यंत ठिय्या आंदोलन छेडले. दरम्यान, मालेगाव येथून पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला. पोलीस उपविभागीय अधिकारी नितीन गणापुरे यांनी घटनास्थळी दाखल होत नागरिकांची समजूत काढली व तातडीने कारवाईचे आश्वासन दिले. त्यानंतर स्थानिक कार्यकर्त्यांच्या मध्यस्थीने रात्री उशिरा मृतदेहाचा पंचनामा करून नामपूर येथे पोस्टमार्टमसाठी रवाना करण्यात आला.

### पोलीस ठाण्यातील होमगार्डचा वावर संशयास्पद!

कर्तव्यावर नसताना देखील होमगार्डचा पोलीस ठाण्यात सततचा वावर आणि प्रत्येक प्रेमसंबंधातील प्रकरणात त्याचा हस्तक्षेप– हे संपूर्ण प्रकरण अधिक संशयास्पद बनवत आहे. या होमगार्डला कुणाचा आशीर्वाद लाभलेला आहे? याचा सखोल तपास होणे आवश्यक आहे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

**प्रेमसंबंधातील त्रास–आत्महत्येचं कारण**

विकी आहिरे याचे गावातील एका तरुणीशी प्रेमसंबंध होते. परंतु, या संबंधांना विरोध करणारे मुलीचे मामा व काका,तुषार मोरे, अर्जुन मोरे, करण मोरे आणि अजंग गावातील नातलग यांनी विकीला सतत शिवीगाळ, धमकी, खोट्या ॲट्रॉसिटी प्रकरणात अडकविण्याची धमकी देत मानसिक छळ सुरू ठेवला होता, अशी फिर्याद विकीच्या भावाने दिली आहे. या छळास कंटाळून विकीने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. या चारही आरोपींविरुद्ध जायखेडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून त्यातील तिघांना अटक झाली आहे.

**पोलिसांची टाळाटाळ– होमगार्डचा संशयास्पद हस्तक्षेप**

या प्रकरणात सर्वात मोठा प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे, या गुन्ह्यातील मुख्य आरोपी असलेल्या होमगार्डच्या पोलीस ठाण्यातील मुक्त वावराबद्दल. स्थानिक नागरिकांनी गंभीर आरोप करत सांगितले की, सदर होमगार्ड कर्तव्यावर नसताना देखील जायखेडा पोलीस ठाण्यात सतत वावरतो. यापूर्वीही तो प्रेमसंबंधासंबंधी प्रकरणांत हस्तक्षेप करत पोलिसांना चुकीच्या दिशेने मार्गदर्शन करतो. त्यामुळेच त्याच्यावर अद्याप कारवाई झाली नसल्याचा आरोप होत आहे.

**"होमगार्डचा मुक्त वावर – कुणाच्या आशीर्वादाने?"**

पोलीस प्रशासनात होमगार्डसारख्या कर्मचाऱ्यांचा असा स्वैर वावर नेमका कुणाच्या वरदहस्तामुळे सुरू आहे, असा संतप्त सवाल आता नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. आत्महत्या झाल्यानंतरही पोलिसांचा हलगर्जीपणा व घटनास्थळी उशिरा पोहोचणे, तसेच मुख्य आरोपीवरील टाळाटाळ नागरिकांच्या रोषाला कारणीभूत ठरत आहे. दुसऱ्या दिवशी, मुख्य आरोपीला अटक झाल्याशिवाय अंत्यविधी न करण्याचा नातेवाईकांनी घेतलेला निर्णय लक्षात घेता परिसरात पुन्हा तणाव निर्माण झाला होता. प्रशासनाने याप्रकरणी तातडीने निष्पक्ष आणि कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आता होत आहे.

# मुंबई नाका परिसरात धोकादायक खड्डे; अपघात, कोंडी, नागरिक त्रस्त



**नाशिक ।** मुंबई नका परिसरात रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून, रस्त्यावरील खड्डे नागरिकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या भागात विशेषतः महामार्ग बसस्थानकाजवळ मोठ्या प्रमाणात खड्डे तयार झाले असून, त्यात पाणी साचल्यामुळे वाहनचालकांसाठी धोका अधिकच वाढला आहे.

मुंबई नाका पोलिसांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने बॅरिकेटिंग करून काही प्रमाणात अपघात कमी केले आहेत. मात्र या बॅरिकेटमुळे वाहतूक कोंडीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः सकाळी आणि सायंकाळी शालेय वाहने, नोकरदार वर्ग आणि प्रवासी यांच्यासाठी हा मार्ग अक्षरशः त्रासदायक बनला आहे. या ठिकाणी नाशिक मनपाने तातडीने खड्डे बुजवावे, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिक करत आहेत. नागरिकांचे म्हणणे आहे की, "प्रत्येक वर्षी पावसाळ्यात हीच परिस्थिती निर्माण होते, पण कायमस्वरूपी उपाय काही केला जात नाही. वेळेत उपाय न केल्यास गंभीर अपघातांना जबाबदार कोण?" महामार्ग बस स्थानकातून दररोज अनेक बसेस राज्यभर विविध शहरांकडे रवाना होत असतात. त्यामुळे येथील वाहतूक सुरळीत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. महापालिकेने या भागातील रस्त्यांचे संपूर्ण पुनर्बांधणी करावी आणि अपघात टाळण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी नागरिकांची जोरदार मागणी आहे.

# मालेगावातील खून १२ तासांत उलगडला

## शिवीगाळीच्या वादातून तरुणाचा गळा आवळला



**मालेगाव ।** सुजन टॉकीज परिसरात २५ वर्षीय युवकाचा खून झाल्याची घटना उघडकीस आली होती. मयताचे नाव अमोल मोहन निकम (रा. एकता नगर, गवळीवाडा, मालेगाव) असे असून, त्याचा मृतदेह जुना आग्रा रोडवरील सुजन टॉकीजच्या आवारात आढळून आला होता.

या घटनेचा तपास करत असताना, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या १२ तासात खुनाचा उलगडा केला. अमोल निकम याची विशाल मारुती गवळी (वय ३८) याच्याशी वाद झाला होता. या वादातून अमोलने शिवीगाळ केल्याचा राग मनात धरून विशालने भगव्या रुमालाने अमोलचा गळा आवळून खून केल्याची कबुली दिली आहे. ही कारवाई नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरज गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोनि रविंद्र मगर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अत्यंत कौशल्याने तपास करून आरोपीला अटक केली असून पुढील तपास मालेगाव छावणी पोलीसठाणे करत आहे.

# अंमली पदार्थविरोधी जनजागृतीसाठी नाशिकमध्ये सायकल रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद!



**नाशिक ।** जून २०२५ रोजी जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधून नाशिक शहरात विविध जनजागृती उपक्रम राबवण्यात आले. महाराष्ट्र राज्य दहशतवाद विरोधी पथक व नाशिक पोलीस आयुक्तालयाच्या मार्गदर्शनाखाली २० ते २६ जून या कालावधीत 'अंमली पदार्थ विरोधी जनजागृती सप्ताह' साजरा करण्यात आला. या सप्ताहात शाळा, कॉलेज आणि सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थांपासून होणाऱ्या दुष्परिणामांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या उपक्रमात गुन्हे शाखा, अंमली पदार्थ विरोधी पथक आणि शहरातील विविध पोलीस ठाण्यांच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. २६ जून रोजी अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त नाशिक पोलीस आणि नाशिक सायकलिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. सकाळी ६:३० वाजता भर पावसातही तब्बल १५० सायकलिस्ट पोलीस आयुक्त कार्यालयात जमा झाले. 'ड्रग ॲडिक्शन थांबवा' हा संदेश देणारे टी-शर्ट आणि सायकलवर लावण्यासाठी प्रबोधनात्मक फलक सायकलिस्टना देण्यात आले. रॅलीच्या सुरुवातीस डॉ. मनिषा रौंदळ यांनी सायकलिस्टसाठी वॉर्मअप सेशन घेतले. पोलिस बँड पथकाच्या साथीने रॅलीचा उत्साह द्विगुणित झाला. 'भारत माता की जय', 'अंमली पदार्थांची नशा, आयुष्याची होईल दुर्दशा', ' से नो टू ड्रग्स,एस टु लाईफ' अशा घोषणा देत रॅलीने पोलीस आयुक्त



कार्यालय, विद्या विकास सर्कल, नेहाण सर्कल, पारिजात नगर चौक, एबीबी सर्कल, सीटी सेंटर, मायको सर्कल, त्र्यंबक नाका, सीबीएस सिग्नल, मेहेर सिग्नल, अशोक स्तंभ मार्गे पोलीस मुख्यालयाजवळील भिष्मराव सभागृहापर्यंत शिस्तबद्ध पद्धतीने मार्गक्रमण केले. रॅलीच्या समारोपस्थळी नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनच्या पथनाट्य पथकाने अंमली पदार्थांपासून होणारे परिणाम, युवक युवतींना लागणारी सवय आणि त्यातील अडथळ्यांविषयी प्रबोधनात्मक नाट्य सादर केले. यामध्ये डॉ. मनिषा रौंदळ, माधुरी गडाख, साधना दुसाने, मोहन देसाई, वैशाली शेलार, मनिषा पवार यांचा सहभाग होता. पथनाट्य सादर करणाऱ्या कलाकारांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांना अंमली पदार्थ विरोधी शपथ दिली गेली. संपूर्ण उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या निरीक्षक सुशिला कोल्हे व त्यांच्या टीमने विशेष मेहनत घेतली. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाचीसांगताझाली.

# आदिवासी पाड्यातून ड्रग माफियांपर्यंतचा लढा

## महाराष्ट्राच्या 'सुपर कॉप' सुशीला कोल्हे यांची धडाडीची कथा!

**नाशिक ।** सुरगाणा तालुक्यातील रोकडपाडा, एक छोटंसं आदिवासी गाव! याच गावात एका लहानशा झोपडीत लहानाची मोठी झाल्या सुशीला कोल्हे. घरात आर्थिक चणचण, शिक्षणासाठी साधनं नाहीत, पण जिद्द अफाट! मातीतून उगम पावलेली ही मुलगी, स्वप्न उराशी बाळगत शिकत राहिली – आणि शेवटी एमपीएससी उत्तीर्ण होऊन पोलीस खात्यात दाखल झाली. पण ही फक्त सुरुवात होती.

तुळजापूरमधील अत्याचार प्रकरण असो, की लातूरच्या रेत माफियांविरोधातली कारवाई सुशीला कोल्हे यांनी प्रत्येक लढाई निडरपणे लढली. त्या फक्त एक पोलीस अधिकारी नाही तर धैर्य, प्रामाणिकपणा आणि कठोर निर्णयांचं जिवंत प्रतीक आहेत! आज त्या नाशिकच्या अँटी-



नार्कोटिक्स सेलमध्ये वरिष्ठ निरीक्षक आहेत. महाराष्ट्रात वाढणाऱ्या ड्रग्स नेटवर्कविरोधात मोहीम उभी करून त्यांनी अनेक रॅकेट उद्ध्वस्त केलीत. आज माफियांना भीती वाटावी अशा त्या अधिकारी आहेत. तरुणाईसाठी नशामुक्तीचा मार्ग दाखवणारा दीपस्तंभ, अशी त्यांची ओळख आहे.

गेल्या वर्षी एम.डी. ड्रग्जची पाळेमुळे नाशिक शहर व परिसरातून उद्ध्वस्त करण्यात आली होती. तरीही असे असताना आजही शहरात काही ठिकाणी एम.डी. ड्रग्जचे पेडलर हे राजरोसपणे एम.डी. ड्रग्जची विक्री करताना दिसून येत आहेत. त्यामुळे सुशिला कोल्हे या येणाऱ्या काळात एम.डी. ड्रग्जचे समूळ उच्चाटन करतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

शहर व परिसरात काही पानटपऱ्यांवर खुलेआम एम.डी. ड्रग्जचा व्यापार सुरू आहे. तर काही ठिकाणी छुप्या पध्दतीने या अंमली पदार्थांची विक्री केली जात आहे. त्यामुळे या सर्व बाबींकडे पोलिसांनी बारकाईने लक्ष ठेवून कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. याकडे पोलिस निरीक्षक कोल्हे या लक्ष देतील, अशी देखील अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ग्रामीण विद्यार्थिनींसाठी १००% सवलतीचा मोफत बस पास वाटप सोहळा उत्साहात



**नाशिक ।** दि न्यू एज्युकेशन इन्स्टिट्यूट, नाशिक संचलित यशोदामाता डायाभाई बिटको गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, नाशिक येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ग्रामीण बस पास योजनेअंतर्गत ग्रामीण भागातून शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थिनींसाठी १००% सवलतीचा मोफत बस पास वितरण कार्यक्रम शनिवार, दि. २८ जून २०२५ रोजी उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात एकूण ५२ विद्यार्थिनींना बस पास वितरित करण्यात आले. हे पास शाळेच्या मुख्याध्यापिका सविता कुशारे, उपमुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी, सी. बी. एस. ठक्कर आगाराचे वाहतूक नियंत्रक सुधीर खोब्रागडे व उपवाहन नियंत्रक संदीप ढवण यांच्या हस्ते देण्यात आले.या प्रसंगी सुधीर खोब्रागडे यांनी मुख्याध्यापिका सविता कुशारे, उपमुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी आणि ज्युनिअर कॉलेजचे उपमुख्याध्यापक मिलिंद कोठावदे यांच्याशी विद्यार्थिनींच्या समस्यांबाबत चर्चा केली. तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ग्रामीण विद्यार्थिनींसाठी १००% सवलतीच्या मोफत बस पास योजनेची माहिती विद्यार्थिनी व शिक्षकांना दिली. बस पास प्राप्त झाल्यामुळे विद्यार्थिनींनी समाधान व आनंद व्यक्त केला. या उपक्रमासाठी शिक्षक किरणकुमार मंडळ व किसन बागुल यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश वैशंपायन, उपाध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी, सेक्रेटरी हेमंत बरकले, शालेय समिती चेअरमन रमेश महाशब्दे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका सविता कुशारे, अधिक्षिका मीना वाळूंजे, उपमुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी, ज्युनिअर कॉलेजचे उपमुख्याध्यापक मिलिंद कोठावदे, पर्यवेक्षिका सुषमा गवारे, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य कैलास बागुल, भारती चंद्रात्रे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# दिवंगत आमदार पुत्राचा महत्त्वाच्या असंख्य कार्यकर्त्यांसह शिंदे शिवसेनेत प्रवेश

**नांदगाव ।** नाशिक जिल्ह्याच्या नांदगाव तालुक्यातील घाट माथ्यावरील छगन भुजबळांचे खंदे समर्थक राष्ट्रवादी काँग्रेसचे व बोलठाण येथील दिवंगत आमदार कन्हैयालाल नहार यांचा पुत्र राजेंद्र नहार व नातू अमित नहार यांनी दि. 26 रोजी असंख्य कार्यकर्त्यांसह नांदगाव तालुक्याचे आ. सुहास कांदे यांच्या निवासस्थानी शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला.या पक्षप्रवेश सोहळ्याच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते बापूसाहेब कवडे हे होते.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, नांदगाव तालुक्याचे माजी आमदार कन्हैयालाल नहार यांचे पुत्र व नातू मंत्री छगन भुजबळ यांचे खांदे समर्थक बोलठाण येथील लोकनेते कन्हैयालाल नहार पतसंस्थेचे अध्यक्ष.अमित नहार तसेच त्यांचे वडील नांदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती राजेंद्र नहार यांनी आमदार सुहास कांदे यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात प्रवेश करून शिवबंधन बांधले. शिवसेना शिंदे गट हा पक्ष नाही तर एक कुटुंब आहे.आपण सर्व या कुटुंबाचे सदस्य झाले आहोत. नहार कुटुंबाने जसे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस सोबत इतके वर्ष राहून कार्य केले त्याच उमेदीने काम कराल ही अपेक्षा ठेवतो असे कांदे म्हणाले.

यापप्रसंगी पिंपरखेड, गिरणा डॅम, वडळी, कासारी, जातेगाव, गोंडेगाव, रोहिले बुद्रुक, कासारी तांडा येथील शिवराम पोकळे, प्रदीप नवले, योगेश शिंदे, रमेश राठोड, नामदेव राठोड, सोनू दळवी, पप्पू आहेर, दादा परदेशी, युवराज दळवी, समाधान जाधव,




उत्तम बागुल, रवींद्र बागुल, सोमनाथ सोनवणे, चेअरमन चंद्रभान कोरडे, माझी सरपंच भगवान पवार, राष्ट्रवादी काँग्रेस तालुका उपाध्यक्ष राजेश शिवाजी सांगळे, वाल्मीक गायखे, विशाल बागुल, भागिनाथ पवार, राजेंद्र गायखे, कल्याण बागुल, गोंडेगाव ग्रामपंचायत माजी सरपंच पांडुरंग जाधव, ज्ञानेश्वर गवळी, गणेश जाधव आणि प्रतिष्ठित नागरिक तसेच राजकीय पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी देखील शिवसेना शिंदे गट पक्षात प्रवेश केला.

याप्रसंगी पक्षप्रवेश सोहळ्याच्या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर केशव राठोड, तेजदादा कवडे, राजाभाऊ जगताप, अनिलतात्या रिंढे, रफिकभाई पठाण, गोकुळ कोठारी, मनोज रिंढे, बंडू पाटील, गुलाब चव्हाण, प्रदीप सूर्यवंशी, संजीव बोरसे, अनिल सोनवणे, दत्तू निकम, विजू बापू सूर्यवंशी, नूतनशेठ कासलीवाल, काशिनाथ काळे, रामचंद्र राठोड, नामदेव राठोड, समाधान जाधव, चंद्रभान कोरडे, भगवान पवार, राजेश सांगळे, सोनू दळवी आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सप्तश्रृंगी गडावर पर्यटकांची गर्दी



## निसर्ग सौंदर्याचा मनमुराद आनंद



**कळवण ।** उत्तर महाराष्ट्राचे कुलदैवत आणि श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र सप्तशृंगी गडावर पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविक आणि पर्यटकांची मोठी गर्दी उसळली आहे. दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येत असताना, सध्या सुरू असलेल्या संततधार पावसामुळे परिसरात निसर्गसौंदर्य खुलून आले असून, शनिवार-रविवारी तर गडावर यात्रेसदृश वातावरण निर्माण होत आहे.

नांदुरी ते सप्तशृंगीगड या सुमारे १० किलोमीटरच्या नागमोडी घाटमार्गावर सर्वत्र दाट हिरवाई, उंच डोंगररांगा, आणि वाहते धबधबे पर्यटकांना आकर्षित करत आहेत. घाटाच्या वळणावळणांवरून दिसणारे दृश्य जणू डोंगरांनी हिरव्या मखमली शालेला अंगावर घेतल्यासारखे भासत आहे. डोंगरावरून कोसळणारे असंख्य लहान-मोठे धबधबे, दाट धुके, आणि ढगांचे आगमन हे दृश्य अधिकच रोमांचक बनवते. पर्यटक मोठ्या उत्साहाने धबधब्याखाली उभे राहत भिजण्याचा आनंद लुटत आहेत. घाटात सतत धुक्याचे साम्राज्य असल्यामुळे वाहनचालकांना दिवसा देखील गाडीच्या हेडलाईटचा वापर करावा लागत आहे. या धुक्यातून प्रवास करताना पर्यटकांना जणू स्वर्गात आलो आहोत, असा अनुभव येत आहे. लहान मुलांना तर हे अनुभव ढगात खेळत असल्यासारखा वाटत आहे. घाटाच्या मध्यभागी असलेल्या प्रसिद्ध पिकनिक पॉइंटवर हजारो पर्यटक गर्दी करत असून, इथून दिसणारी खोल दरी, उंचावरून कोसळणारा शुभ्र धबधबा, आणि समोर उभा असलेला मार्कंडेय पर्वत पर्यटकांना भुरळ घालत आहे. येथे अनेकजण निसर्गाच्या कुशीत सेल्फी घेताना दिसत आहेत. गडाच्या पायथ्याला आणि परिसरात गरमागरम कांदा-भजी, मक्याचे कणीस, वडापाव, चहा-कॉफी यांचा आस्वाद घेण्यासाठी पर्यटकांची झुंबड उडालेली आहे. त्यामुळे स्थानिक हॉटेल व्यवसायिक व विक्रेत्यांना देखील चांगली कमाई होत आहे. दरम्यान, सततच्या धुक्यामुळे रोपवे ट्रॉलीही पर्यटकांसाठी आकर्षण ठरत आहे. धुक्यातून वर जाणारी ट्रॉली पाहताना पर्यटकांना जणू स्वर्गाची सफर करत असल्याचा भास होत आहे. सप्तशृंगी गड परिसर सध्या निसर्गप्रेमींसाठी एक पर्वणी ठरली असून, पावसाळ्यातील हे अद्भुत दृश्य अनुभवण्यासाठी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच गडाकडे ओढले जात आहेत.

# पिंपळनेर नगर परिषदेसमोरील अनधिकृत अतिक्रमण काढले पोलीस बंदोबस्तात!










**पिंपळनेर ।** येथील नगर परिषदेसमोर मोठ्या प्रमाणात अनधिकृत गाळेधारकांनी दुकाने थाटली होती.गेल्या अनेक वर्षांपासून सदर दुकाने या ठिकाणी सुरू होती.यापूर्वी देखील प्रशासनाने संबंधितांना नोटिस बजावल्या होत्या मात्र सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने अतिक्रमण काढण्याचा मार्ग निघत नव्हता अखेर शुक्रवार दिनांक २७ जून रोजी सकाळी ८ वाजेपासून पिंपळनेर नगर परिषदेच्या वतीने पोलीस बंदोबस्तात सर्व अतिक्रमण काढण्यात आले आहे.येथील गाळेधारकांनी नोटीस व अनधिकृत अतिक्रमण विरोधातील कारवाईस न्यायालयात आव्हान दिले होते. तर धुळे जिल्हा सत्र न्यायालय, धुळे दिवाणी न्यायालयाने त्यांचा तात्पुरत्या स्थगनाच्या अर्जास नकार दिला होता.तर नगर परिषदेतर्फे न्यायालयात सादर करण्यात आलेल्या पुराव्यानुसार हे गाळे सार्वजनिक रस्त्याच्या जागेवर अनधिकृतपणे उभारण्यात आले आहेत हे सिद्ध झाले. दरम्यान सर्व अतिक्रमणधारकांना न्यायालयाच्या आदेशानुसार अतिक्रमण काढून घेण्याबाबत १५ दिवसांची मुदत देण्यात आली होती. मुदत संपल्यानंतर पिंपळनेर नगर परिषदेच्या वतीने सर्व अतिक्रमण धारकांना अतिक्रमण काढून घेण्याबाबत नोटीस देण्यात आली त्यानुसार शुक्रवारी हे अतिक्रमण प्रशासनाने काढले आहे.तर काही अतिक्रमणधारकांनी स्वतःहून अतिक्रमण काढून घेतले आहे. यावेळी पिंपळनेर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दिपक पाटील, साक्रीचे उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बांबळे, पिंपळनेरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण बर्गे, पोलीस उपनिरीक्षक विजय चौरे, भूषण शेवाळे यांसह नगरपरिषदेचे कर्मचारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान पिंपळनेर नगर परिषदेच्या वतीने अतिक्रमण धारकांविरोधात करण्यात आलेल्या कारवाईचे पिंपळनेर शहरातून सर्वत्र कौतुक केले जात आहे. नगरपरिषदेसमोरील अतिक्रमणाचा तिढा अनेक वर्षानंतर सुटला असला तरी आगामी काळात शहरात इतरत्र मोठ्या प्रमाणात वाढलेले अतिक्रमण काढण्याचे मोठे आव्हान पिंपळनेर नगर परिषदेसमोर असणार आहे. त्यामुळे आता पिंपळनेर परिषद शहरांतर्गत असलेले इतर अतिक्रमण काढणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> भविष्यात पिंपळनेर शहरात अतिक्रमण होणार नाही यासाठी पिंपळनेर नगरपरिषदेमार्फत कायमस्वरूपी उपाययोजना आखण्यात येत आहेत.याबाबत प्रशासकीय पातळीवर प्रस्ताव तयार केला जात आहे.
>
> **– श्री. दीपक पाटील, प्रशासक, नगरपरिषद, पिंपळनेर**

## ...तरच पुन्हा अतिक्रमण होणार नाही..!

न्यायालयाच्या आदेशानुसार अनेक वर्षानंतर हे अतिक्रमण निघाले असले तरी यापुढील काळात या भागात पुन्हा कोणतेही अतिक्रमण होणार नाही यासाठी प्रशासनाला सतर्क राहावे लागणार आहे.कारण हा भाग अत्यंत वर्दळीचा असल्याने येथे नेहमीच गर्दी राहत असते. तर रस्त्यालगत दुकान लावल्याने वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. म्हणून प्रशासनाला पुन्हा अलर्ट राहावे लागेल.

## महत्त्वाचे

### स्वयंदीप सोशल फाउंडेशनतर्फे शालोपयोगी साहित्याचे वाटप

**नाशिक ।** स्वयंदीप सोशल फाउंडेशन पुणे संस्थेच्या वतीने मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थिनी वसतिगृहातील २४० विद्यार्थिनींना शालोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल, दप्तर इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रारंभी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. मुलींनी बुद्ध वंदना आणि स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमामध्ये स्वयंदीप सोशल फाउंडेशन संस्थेच्या अध्यक्षा सौ. प्रतिभा विवेक वानखेडे, वर्षा प्रशांत चौरे, फाल्गुनी संजय सोनवणे यांनी विद्यार्थिनींना शुभेच्छा देत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. यावेळी संस्थेचे सचिव पी. के.गायकवाड उमेश सोनवणे यांनी स्वयंदीप सोशल फाउंडेशन संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले व विद्यार्थिनींनी शिक्षणाच्या माध्यमातून उंच भरारी घ्यावी, असे मार्गदर्शन केले. स्वयंदीप सोशल फाउंडेशन संस्था गेल्या अनेक वर्षांपासून मातोश्री रमाबाई आंबेडकर वसतिगृहाबरोबरच शिक्षण, आरोग्य व महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात कार्यरत असून समाजातील उपेक्षित घटकांना मदतीचा हात देत आहे. शैक्षणिक साहित्य वाटपाच्या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांचे नवीन शैक्षणिक वर्ष सुरळीत पार पडण्यासाठी मदत झाली आहे. यावेळी सुरेखा पवार, सुजाता भालेराव आदी उपस्थित होते.

# वीज दर कपातीचे सिमाकडून स्वागत

## एक एप्रिलपासून लाभ देण्याची मागणी

**सिन्नर ।** राज्य वीज नियामक आयोगाने औद्योगिक ग्राहकांसह घरगुती व व्यावसायिक वीज दर आकारणीत कपात केली आहे. या निर्णयाचे सिन्नर इंडस्ट्रीयल अँण्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (सिमा) स्वागत केले आहे. या कपातीचा लाभ एक एप्रिलपासून देण्यात यावा, अशी मागणी केली आहे.

सिमाचे अध्यक्ष किशोर राठी, उपाध्यक्ष किरण भंडारी, सचिव बबन वाजे, कोषाध्यक्ष राहुल नवले, विश्वस्त मारुती कुलकर्णी, रतन पडवळ, मुकेश देशमुख, सुकुमार नायर, किरण बडगुजर, नारायण क्षिरसागर, अरुण चव्हाणके, लक्ष्मण डोळे, दत्ता ढोबळे, बाबासाहेब हरदे, नवनाथ नागरे,नंदकुमार पाटील, सारंग कुलकर्णी, सारंग, सतीश नेहे, शांताराम दारुंटे, शशिकांत नवले, दत्ता नवले, तानाजी वारुंगसे आदींनी ही मागणी केली आहे.

राज्य सरकारने वीज दरात कपात करण्याचा निर्णय घेतला होता. त्यास महावितरणे हरकत घेऊन विद्युत आयोगाकडे याचिका दाखल केली होती तथापि, त्यास स्थगिती देण्यात आली. त्यानंतर सरकारच्या निर्णयानुसार राज्य नियामक आयोगाने वीज तर कपातीचा निर्णय नुकताच दिला आहे. त्यात पहिल्या वर्षी दहा टक्के वीज कपात होणार असून टप्प्याटप्प्याने पाच वर्षांमध्ये 26 टक्के वीज कपात होणार आहे. त्याचा राज्यभरातील लाखो औद्योगिक व घरगुती सर्वच ग्राहकांना लाभ होणार आहे.

औद्योगिक वसाहतीत वीजेचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. आधीच जास्त वीज दरामुळे उद्योजक त्रस्त होते. त्यात सरकारच्या धोरणानुसार नाशिक जिल्ह्याच्या तुलनेत मराठवाडा व विदर्भातील कारखान्यांना कमी वीज दर आहे. विदर्भातील वीज दराप्रमाणे नाशिक जिल्ह्यातील औद्योगिक ग्राहकांना वीज दर असावे, अशी अनेक वर्षांची मागणी आहे. सध्या ग्रीन एनर्जी चा वापर जास्त प्रमाणात होत असून ती स्वस्त आहे. त्याचा लाभ थेट ग्राहकांना शासनाने देण्याचे ठरवले आहे त्यामुळे वीज खर्चात जवळपास 60000 कोटीची बचत होणार असून त्याचा फायदा ग्राहकांना व्हावा अशी शासनाची अपेक्षा आहे. राज्यभरात वीज दर कमी करण्याचा निर्णय झाल्यामुळे औद्योगिक ग्राहकांना थोडा का होईना दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे स्टील उद्योगांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### एप्रिलपासून लाभ मिळावा

> सरकारने या आधीच वीज दर कपातीचा निर्णय घेतला होता. परंतु, स्थगिती दिल्यामुळे उशीरा सवलत लागू झाली आहे. किमान १ एप्रिलपासून हा लाभ लागू करावा.
>
> **– बबन वाजे (सचिव, सिमा)**

# सामाजिक न्यायाची प्रेरणा, नशामुक्त समाजाची शपथ

## नाशिक मनपात अंमली पदार्थ विरोधी दिन




**नाशिक ।** नाशिक महापालिकेच्यावतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती साजरी करण्यात आली. जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधून विशेष कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते.

मनपा मुख्यालय राजीव गांधी भवन येथील स्वागत कक्षाजवळ राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस उपआयुक्त प्रशासन लक्ष्मीकांत साताळकर, नितीन पवार, तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमास अतिक्रमण उपायुक्त सुवर्णा दखणे, कार्यकारी अभियंता बाजीराव माळी, स्वीय सचिव दिलीप काठे, कैलास दराडे, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, चंद्रकांत सोनार, योगेश आडभाई, संतोष चंद्रात्रे, संतोष कान्हे, मनीषा पाटेकर, साहेबराव भोसले, दीपक पुरी, विशाल नवले, संजय पटेल, दीपक बंदरे, मनोज विभांडीक, मनोज गायधनी, रमेश पागे आदी अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांनुसार जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना नशामुक्त समाजासाठी प्रतिज्ञा देण्यात आली. प्रतिज्ञेचे वाचन जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी केले. महापालिकेच्यावतीने पुढील काळातही समाजसुधारणेसाठी आणि युवकांना नशेपासून दूर ठेवण्यासाठी जनजागृती उपक्रम राबविले जातील, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# असंघटित, घरेलू कामगारांच्या मागण्यांसाठी महसूल कार्यालयावर मोर्चा





## अप्पर महसूल आयुक्तांना शिष्टमंडळाचे निवेदन

**नाशिक ।** असंघटित व घरेलू कामगारांच्या मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस संघटित कामगार विभागातर्फे शुक्रवारी (दि.२७) विभागीय महसूल आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर अप्पर महसूल आयुक्तांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

असंघटित व घरेलू कामगारांना घरकुल योजनेचा लाभ, कामगार उपायुक्त कार्यालयाकडून दिले जाणारे भांडे गृहपयोगी वस्तू यांचे सरसकट वाटप व्हावे तसेच घरेलू कामगार असंघटित कामगार यांना सरकारी दवाखाना व महानगरपालिका दवाखाना यामध्ये मोफत आरोग्य सेवा द्यावी, जे घरेलू कामगार असंघटित कामगार साठ वर्षांपुढील आहे अशांना नोंदणीप्रमाणे संजय गांधी निराधार, श्रावणबाळ वृद्धापकाळ योजनेंतर्गत मोबदला पेन्शन स्वरूपात द्यावा, घरेलु व संघटित कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी फीमध्ये सवलत द्यावी, महानगरपालिका व जिल्हा परिषद यांच्या शाळेचा दर्जा सुधारण्यात यावा, अशा अनेक मागण्या या मोर्चादरम्यान करण्यात आल्या. या मोर्चाचे नेतृत्व शहर जिल्हाध्यक्ष संतोष शेळके, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते निवृत्ती आरंगळे, नाशिकरोड विभाग अध्यक्ष मनोहर कोरडे, कार्याध्यक्ष योगेश मिसाळ, शहर संघटक बबन गायकवाड, अमर नारायणे, आकाश घोडे, राजू पवार, प्रवीण कुशारे, महिला आघाडीच्या मनीषा शिंदे, पूजा हिरे, रूपाली कापसे, आशा कुंदे, संगीता महालकर, अर्चना कुलकर्णी, नागेश भडांगे, दीपक चावरे आदी महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘अक्षरबाग’ हा विद्यार्थिनींसाठी स्तुत्य उपक्रम : वैशंपायन



**नाशिक ।** जून हा ज्येष्ठ साहित्यिका व समीक्षक तसेच दि न्यू एज्युकेशन इन्स्टिट्यूट नाशिक या संस्थेच्या मार्गदर्शक स्वर्गीय जान्हवी वैशंपायन यांचा जन्मदिन दि न्यू एज्युकेशन इन्स्टिटयूट,नासिक या संस्थेच्या वाय.डी. बिटको गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये ‘अक्षरबाग’ या वेगळ्या संकल्पनेतून त्यांना साहित्य अभिवादन करण्यात आले.. त्याचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष माननीय प्रकाश वैशंपायन यांच्या शुभहस्ते करण्यात आले. अक्षरबाग संकल्पनेबद्दल उपमुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी यांनी माहिती दिली.

‘अक्षरबाग’ या संकल्पनेत अनेक मान्यवर कवींच्या कवितांनी बाग सुशोभित करण्यात आली असून यामध्ये कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज, बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे,कवी मंगेश पाडगावकर, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते कवी डॉ. सुरेश सावंत, सुप्रसिद्ध बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड, युवा साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रा. ऐश्वर्य पाटेकर, बालसाहित्यिक राजेंद्र सोमवंशी, शाळेची विद्यार्थिनी बालकवयित्री कु.प्रगती धात्रक यांच्या कवितांचा समावेश आहे.त्याचबरोबर विद्यार्थिनींना अभिव्यक्त होण्याकरीता मुक्तफळा या संकल्पनेतून ‘माझा फळा’ या उपक्रमांतर्गत माझी कविता, माझी चित्रकला यासाठीही फळा उपलब्ध करून देण्यात आल्याने विद्यार्थिनींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या कार्यक्रमाला संस्थेचे सेक्रेटरी हेमंत बरकले, शाळेच्या अधिक्षिका मिना वाळुंजे, मुख्याध्यापिका सविता कुशारे, डी.डी.बिटकोच्या मुख्याध्यापिका जयश्री पेंढारकर, उपमुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी, मिलिंद कोठावदे, पर्यवेक्षिका सुषमा गवारे, ग.कौ. सदस्य अमृता कवीश्वर,भारती चंद्रात्रे, दिनेश जाधव, अनिल ठाकरे, कैलास बागुल उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन भारती चंद्रात्रे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

